प्रेसनोट दि. ११/०९/२०१९

**"महसूली अधिका-यांच्या ताब्यातून ट्रक पळवून चोरून नेणा-या व १० महिन्यांपासून फरार असलेल्या गुन्हेगारास ट्रक व वाळूसह गुन्हे शाखा,युनिट ०४ ने केले जेरबंद"**

हडपसर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये शेवाळवाडी फाटा,हडपसर या ठिकाणी दि.०२/१०/२०१८ रोजी महसूल अधिकारी व पथक यांनी वाळू तस्करांवर कारवाई करून वाळूसह ट्रक जप्त करून ताब्यात घेतले होते.**ट्रक नं.एम एच/१४/डीएम/०७७८** हा ट्रक व इतर ट्रक हे महसूल पथकाचे कायदेशीर ताब्यात असताना ट्रकचालकांनी संगणमत करून महसूल पथकाची नजर चुकवून त्यांचे ताब्यातून पळवून नेल्याने त्यांचेविरुध्द मंडल अधिकारी यांनी दिलेले फिर्यादीवरून हडपसर पोलीस स्टेशन या ठिकाणी गु.र.नं.१११३/२०१८ भा.दं.वि कलम-३७९,३४ अन्वये दि.०२/१०/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.सदर दाखल गुन्हयातील पाहीजे ट्रक व आरोपी हे ऑक्टोंबर २०१८ पासून फरार झालेले होते व पोलिसांना गुंगारा देत अदयापपर्यंत मिळून येत नव्हते.

दि.०९/०९/२०१९ रोजी रात्रौ गुन्हे शाखा,युनिट-०४ चे **पोलीस उपनिरीक्षक विजय झंजाड व पोलीस नाईक सुरेंद्र साबळे** यांना खबर मिळाली की,वरील दाखल गुन्हयातील महसूल पथकाचे ताब्यातून पळवून नेलेला **ट्रक नं.एम एच/१४/डीएम/०७७८** हा दौंड येथून वाळू घेवून पुणे शहरामध्ये वाळू विक्रीसाठी येणार आहे.सदरबाबत मा.पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान यांनी पुणे सोलापूर रोडवर ट्रॅप लावून सदरचा ट्रक ताब्यात घेण्याचे आदेश दिले.त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक विजय झंजाड,शिवराज हाळे,पोलीस कर्मचारी गणेश साळूंके,शितल शिंदे,सुरेंद्र साबळे,रमेश बोराटे यांनी दि.१०/०९/२०१९ रोजी रात्री ००.१५ वा.पासूनच पुणे सोलापूर रोडवर गस्त घालून ट्रॅप लावला असता त्यांना चौफुला,पुणे सोलापूर रोड या ठिकाणी संशयित ट्रक हा पुण्याचे दिशेने येताना दिसला नमूद अधिकारी व स्टाफने त्यास थांबण्याचा इशारा दिला असता सदर ट्रक न थांबता वेगाने धावू लागला असता नमूद स्टाफने सरकारी वाहन सुमो जीपने सदर वाहनाचा पाठलाग करून त्यास लोणी काळभोर टोलनाका या ठिकाणी ०८.०० वा.सुमारास नमूद ट्रक (वाळूसह) **किं.रुपये ७५००००/-** व आरोपी ट्रक चालक नामे **किसन सोपान जाधव,वय-४५ वर्षे,रा.मु-जाधववाडी,पो-गिरीम,ता.दौंड,जि पुणे** यास जागीच पकडून पुढील कार्यवाहीकामी हडपसर पोलीस स्टेशनचे ताब्यात सुपूर्द करण्यात आलेले आहे.पुढील तपास हडपसर पोलीस स्टेशन महिला पोलीस उपनिरीक्षक श्रीमती वर्षा बांबे हया करीत आहे.

**सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.अशोक मोराळे,पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री.बच्चनसिंग,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा)डॉ.श्री.शिवाजी पवार,पोलीस निरीक्षक श्री.अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली** पोलीस उपनिरीक्षक विजय झंजाड,शिवराज हाळे,पोलीस कर्मचारी गणेश साळूंके,शितल शिंदे,हनुमंत बोराटे,सुरेंद्र साबळे **सर्व नेमणूक गुन्हे शाखा,युनिट-०४ यांचे पथकाने केलेली आहे.**

दि.११/०९/२०१९

(अंजुम बागवान)
पोलीस निरीक्षक
युनिट-०४,गुन्हे शाखा